# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका

**विषय:- भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेच्या प्रशासकीय कामकाजाकरीता मागणी प्रमाणे अधिकारी वर्गास व विभागास तसेच शासनाच्या विविध योजना राबविणे करीता भाडेतत्त्वावरील वाहने इंधन व वाहनचालकासह पुरविणे.**

**प्रस्तावना :-**

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेच्या प्रशासकीय कामकाजाकरीता अधिकारी वर्गास व विभागास, तसेच शासनाच्या विविध योजना राबविणे कामी भाडेतत्त्वावरील वाहने पुरविणे कामी आचार संहिता संपुष्टात येताच नविन निविदा प्रक्रिया राबविणे करीता मा. प्रशासक तथा आयुक्त सो. यांनी निर्देश दिले आहेत. पदवीधर निवडणुकीमुळे आचार संहिता लागु असल्याने नविन निविदा प्रक्रिया राबविण्यात आली नाही आचार संहिता संपुष्टात येताच भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेच्या प्रशासकीय कामकाजाकरीता अधिकारी वर्गास व विभागास भाडेतत्त्वावरील कार, जीप इत्यादी वाहने पुरविणे कामी निविदा प्रक्रिया राबविणे कामी मा. वाहन व्यवस्थापक सो यांनी निर्देश दिले आहेत.

भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेच्या प्रशासकीय कामकाजाकरीता अधिकारी वर्गास व विभागास, तसेच शासनाच्या विविध योजना राबविणे कामी भाडेतत्त्वावर वाहने पुरविणे कामी प्रादेशिक परिवहन कार्यालय, ठाणे यांचे कडील प्रापका/ठाणे/RTA/२०२४/जा.क्र.१५१८, दि.०१/०४/२०२४ नुसार दर प्राप्त झाले आहेत.

भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेच्या प्रशासकीय कामकाजाकरीता मागणी प्रमाणे अधिकारी वर्गास व विभागास तसेच शासनाच्या विविध योजना राबविणे करीता भाडेतत्त्वावरील भाडेतत्वावरील कार, जीप, डंपर, क्रेन, टोईंग वॅन, बस, जेसीबी व पोकलन इत्यादी वाहने इंधन व वाहनचालकासह पुरविणे कामीची त्रैवार्षिक तीन वर्षे कालावधीची निविदा प्रसिद्ध करणे कामी मा. प्रशासक तथा आयुक्त सो. यांनी आर्थिक व प्रशासकीय मान्यता प्रदान केली आहे.

भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेच्या प्रशासकीय कामकाजाकरीता मागणी प्रमाणे अधिकारी वर्गास व विभागास तसेच शासनाच्या विविध योजना राबविणे करीता भाडेतत्वावरील कार, जीप, डंपर, क्रेन, टोईंग वॅन, बस, जेसीबी व पोकलन इत्यादी वाहने इंधन व वाहनचालकासह पुरविणे कामी त्रैवार्षिक (तीन वर्षे कालावधीची) निविदा प्रसिद्ध करणे कामीच्या प्रस्तावास मा.महासभेची मान्यता आवश्यक आहे. सद्या शासनाचे दिनांक १० जुन २०२२ च्या आदेशान्वये मा.आयुक्त यांना प्रशासक म्हणून नियुक्त करण्यात आलेले असल्याने मा.महासभेचे सर्व अधिकार मा. प्रशासक तथा आयुक्त यांना प्राप्त झालेले आहे. या अधिकार कक्षे नुसार उपरोक्त प्रस्तावास मा. प्रशासक तथा आयुक्त भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका यांच्या धोरणात्मक निर्णयासाठी सदरचा प्रस्ताव सविनय सादर.

**प्रशासकीय ठराव क्रमांक :-** ४०४ **दिनांक :-** 03/06/2024

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ४५२ (अ) (१) नुसार दिनांक १० जुन २०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी श्री. अजय वैद्य, प्रशासक, भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेच्या प्रशासकीय कामकाजाकरीता मागणी प्रमाणे अधिकारी वर्गास व विभागास तसेच शासनाच्या विविध योजना राबविणे करीता भाडेतत्वावरील कार, जीप, डंपर, क्रेन, टोईंग वॅन, बस, जेसीबी व पोकलन इत्यादी वाहने इंधन व वाहनचालकासह पुरविणे कामी त्रैवार्षिक (तीन वर्षे कालावधीची) निविदा प्रसिद्ध करणे कामीच्या प्रस्तावास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.

**वरील प्रमाणे ठराव मंजुर**

**(अजय वैद्य)**
**प्रशासक**
**भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका**